## ०१ मे २०२२ च्या ध्वजारोहण कार्यक्रमा प्रसंगी मा.पालकमंत्री महोदय यांचे भाषणाकरीता राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रम, कोविड-१९ काळातील आरोग्याच्या उपाययोजना व कोविड-१९ लसीकरणाबाबत संक्षीप्त टिपणी.

भंडारा जिल्हयात ग्रामिण भागात ३३ प्राथमिक आरोग्य केंद्र, ३३ आयुर्वेदिक/आंग्ल दवाखाने व १९३ उपकेंद्रामार्फत उपचारात्मक, प्रतिबंधात्मक सेवा देऊन आरोग्य सेवा पूरविल्या जातात.

१) **कुटूंब कल्याण कार्यक्रम** :- या कार्यक्रमाअंतर्गत सन २०२१-२२ मध्ये कुटूंब नियोजन शस्त्रक्रियेचे उध्दिष्ट ६७९० असुन, माहे मार्च २०२२ अखेरपर्यंत ५९३१ (८७ टक्के) साध्य केलेले आहे.

२) **प्रधानमंत्री मातृवंदना योजना** :- कुपोषणामुळे स्त्रीयांच्या आरोग्यावर विपरित परिनाम होतो. कुपोषण मातेच्या गर्भाशयात सुरु होते व बाळाच्या पहिल्या सहा महिण्यात निव्वळ स्तनपान करण्याच्या त्यांच्या क्षमतेवर परिनाम होते ते टाळण्याकरीता दिनांक १ जानेवारी २०१७ पासुन ही योजना सर्व जिल्हयात राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत रु.५,०००/- चा लाभ गरोदर व स्तनदा मातांच्या पहिल्या जिवंत अपत्यासाठी मातेच्या खात्यात थेट तिन हपत्यात जमा करण्यात येतात. प्रथम हप्ता गरोदरपणाची नोंदणी केल्यावर रु.१०००/-, दुसरा हप्ता गरोदरपणाच्या सहा महिण्यानंतर रु.२०००/- व तिसरा हप्ता बाळाच्या जन्माची नोंद झाल्यावर व बाळास लसीकरणाचा पेन्टा-३ डोस पूर्ण केल्यावर रु.२०००/- चा हप्ता भंडारा जिल्हयात दि.१ जानेवारी २०१७ पासुन पात्र लाभार्थ्यांना सदर योजनेअंर्तत देण्यात लाभ देणे सुरु झालेले आहे. व आज पर्यंत ३९२७४ लाभार्थ्यांना लाभ अदा करण्यात आलेले आहे.

३) **महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना** राज्य शासनाची व केंद्र शासनाची आयुष्मान भारत, प्रधानमंत्री जन आरोग्य योजना अशा दोन्ही योजना एकत्रित पणे दिनांक १ एप्रिल २०२० पासुन राज्यात लागु करण्यात आली आहे. या दोन्ही योजनेतुन जिल्हयातील ०४ शासकिय (जिल्हा रुग्णालय भंडारा, उपजिल्हा रुग्णालय तुमसर, उपजिल्हा रुग्णालय साकोली, ग्रामिण रुग्णालय पवनी) तसेच ०७ इतर खासगी रुग्णालयामध्ये काही निवडक व गंभीर स्वरुपाचे आजारावर औषधोपचार व शस्त्रक्रिया मोफत केली जाते, दोन्ही योजनेच्या लाभाकरीता रु.५.०० लक्ष पर्यंतच्या औषधोपचार व शस्त्रक्रियेचा लाभ घेत आहे.

सदर योजनेतुन ४०७२ रुग्णांनी रु.४,७६,३४,४५७/- पेक्षा जास्त रक्कम विमा कंपनी मधील रुग्णालयास अदा करण्यात आली आहे. प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या लाभार्थीचे १,९३,००० ई-कार्ड वाटप करण्यात आले आहे.

४) **प्रजननं व बाल आरोग्य कार्यक्रम** :- या कार्यक्रमाअंतर्गत सन २०२१-२२ मध्ये गरोदर माता नोंदणी १७६८५ करण्यात आली. एकुण बाळंतपणे १८३७५ त्यापैकी संस्थेतील बाळंतपणे १८३६० झालेले आहे. मातामृत्यु व बालमृत्यु चे प्रमाण कमी झालेले आहे. लसीकरण कार्यक्रमाअंतर्गत सन २०२१-२२ मध्ये झालेले कार्य बि.सी.जी.लस १७८०९, पेन्टाव्हॅयलेंट लस १६८४३ , एम.आर.लस १५४०४ बालकांना लसीकरण करण्यात आले आहे.

५) **मानव विकास कार्यक्रम** :- या कार्यक्रमाअंतर्गत सन २०२१-२२ मध्ये जिल्हयात एकुण २९५ शिबीरे आयोजीत करण्यात आले, त्यामध्ये गरोदर मातांची तपासणी ११५५६ आणि स्तनदामाता ४२४४ तपासणी करण्यात आली, तसेच ० ते ६ वर्षे वयोगटातील एकुण ४२४० बालकांची तपासणी पूर्ण करण्यात आली. त्यामुळे उपजतमृत्यु व अर्भकमृत्युचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली.

६) **दुर्धर आजाराने पिडीतांना अर्थसहाय्य** :- शासन परिपत्रक एल.एप.सी.२००६/प्र.क्र.४७७०/ वित्त-३ ग्राम विकास व जलसंधारण विभाग मंत्रालय मुंबई दि.०३ नोव्हेंबर २००६ नुसार ह्दयरोग, कर्करोग तसेच किडणीरोग अशा दुर्धर आजाराने पिडीतांना जिल्हा परिषद राजस्व निधीतुन रु.१५,०००/- पर्यंत

आर्थीक मदत देण्यात येते. या योजनेसाठी सन २०२१-२२ या आर्थीक वर्षात जिल्हा परिषद राजस्व निधीतुन रु.१५,००,०००/- अनुदानाची तरतुद करण्यात आली आहे. व माहे मार्च २०२२ पर्यंत ५१ रुग्णांना लाभ देण्यात आला.

७) <u>जननी सुरक्षा योजना (जेएसवाय)</u> :- जननी सुरक्षा योजना ही ग्रामिण व शहरी भागाकरीता राबविल्या जाते. त्यात BPL, SC आणि ST कुटूंबातील गरोदर माता तिचे वय कितीही असेल तरी आणि त्यामातेस कितीही अपत्य असेल तरी व शासकिय आरोग्य संस्थेत अथवा मानांकित आरोग्य संस्थेत प्रसुती झाल्यास रु.७००/- ग्रामिण भागाकरीता व रु.६००/- शहरी भागाकरीता देण्यात येतात. तसेच घरी झाल्यास फक्त BPL कुटूंबातील लाभार्थींस रु.५००/- देण्यात येतात. सन २०२१-२२ योजनेचे उध्दिष्ट ५१९५ असुन माहे मार्च २०२२ पर्यंत ७३४३ (१४१ टक्के) उध्दिष्ट साध्य झालेले आहे.

८) <u>जननी शिशु सुरक्षा कार्यक्रम (जे.एस.एस.के.)</u> :- जननी शिशु सुरक्षा कार्यक्रमाअंतर्गत गर्भवती माता व ०१ वर्षापर्यंतच्या आजारी बालकांना घरुन संस्थेत, संस्थेतुन संस्थेत आणि संस्थेतुन घरी निशुल्क वाहन सेवा दिली जाते. त्याचबरोबर गरोदर मातेस निशुल्क जेवन व औषधी पुरविली जाते. सन २०२१-२२ मध्ये माहे मार्च २०२२ पर्यंत एकुण ११२३० (९५ टक्के) मातांला PickUp सेवा व ११४७९ (९७ टक्के) मातांना Drop Back सेवा देण्यात आली. तसेच माहे मार्च २०२२ पर्यंत १५२८ (८२ टक्के) बालकांना Drop Back सेवा देण्यात आली.

९) <u>सिकलसेल नियंत्रण कार्यक्रम</u> :- या कार्यक्रमाअंतर्गत सन २०२१-२२ मध्ये ३९१३४ लोकांची तपासणी करुन उपचारात्मक व प्रतिबंधात्मक सेवा पुरविण्यात आल्यात.

१०) <u>कोविड — १९ आजार</u> :- जिल्हयात कोविड संसर्गजन्य रोग नियंत्रणात आणण्याकरीता १५ कोविड केअर सेंटर, ४४ डेडीकेटड कोविड हेल्थ हॉस्पीटल, ०१ डेडीकेटेड कोविड हॉस्पीटल आहेत. जिल्हयात १८ एप्रिल २०२२ पर्यंत RTPCR - १२४३०२, RAT -४६४५०१, TRU-NAT-२८६, अशा प्रकारे एकुण ५८९०८९ रुग्णांच्या तपासण्या करण्यात आलेल्या आहेत.आजतागायत ६७९१० रुग्ण दुषीत आढळले असुन त्यापैकी ११४२ रुग्णांचा मृत्यु झालेला असुन मृत्यु दर १.६८ आहे. तर रिकव्हरी दर ९८.३२ आहे. सद्य:स्थितीत जिल्हयात ०० ॲक्टीव्ह केसेस आहेत.

जिल्हयात ३३ प्राथमिक आरोग्य केंद्र, १९३ उपकेंद्र, ०९ ग्रामिण/उपजिल्हा रुग्णालय, ०१ जिल्हा रुग्णालय, ०१ नागरी आरोग्य केंद्र अशा प्रकारे २३७ केंद्रांवर कोविड -१९ लसीकरण सुरु आहे. पहिल्या डोसचे ९८५५९९ लाभार्थीना व दुसरा डोस घेतलेले ८४४४९४ लाभार्थीना, बुस्टर डोस १९३८३ तर १२ ते १४ वयोगटातील बालकांना २९१८६ कोर्बिव्हॅक्स लसीद्वारे लसीकरण करण्यात आले. कोविड -१९ लसीकरण करण्यात आलेले आहे. तसेच कोविड-१९ लसीकरणाचे काम वाढविण्याकरीता आरोग्य विभागामार्फत जनजागृती करण्यात येत आहे.

यापुढे दर्जात्मक आरोग्य सेवा पुरविण्याकरीता आरोग्य विभाग कटिबध्द राहील.

जिल्हा आरोग्य अधिकारी,<br>
जिल्हा परिषद, भंडारा.